**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - वेतन - २०१९/अशा.महा./१२/वेतनपथक, पुणे दिनांक - ११ फेब्रुवारी, २०२०

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.

२. कुलसचिव/वित्त व लेखा अधिकारी,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे

**विषय - १. महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बदल्या व नवीन नियुक्त्यांना मान्यता देणेबाबत.**

**२. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करावयाचे बदल.**

**३. अर्जित रजा रोखीकरणाचे प्रस्ताव.**

**१. महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या बदल्या व नवीन नियुक्त्यांना मान्यता देणेबाबत -**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये ब-याच महाविद्यालयांमधील शासन मान्य पदावर कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा बदल्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा सर्व कर्मचा-यांना त्यांच्या बदलीच्या ठिकाणी रुजू होऊन त्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये योग्य ते बदल करुन घेण्यासाठी खालील विवरणपत्रामध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये तयार करुन सदरहू माहिती खाली नमूद केलेल्या दिनांकास वेळेत याच कार्यालयामध्ये याबाबतच्या सर्व कागदपत्रासह सादर करण्यात यावी. **तसेच संबंधीत कर्मचा-यांना एचटीई सेवार्थ प्रणालीमधून Detach करण्यात यावे.**

**माहे फेब्रुवारी, २०२० या महिन्यामध्ये झालेल्या बदलींची माहिती दर्शविणारे विवरणपत्र**

Name of the College - H T E Sevaarth userId - H T E Sevaarth Password -

**अ) आपल्या महाविद्यालयामधून इतर महाविद्यालयांमध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Relieving | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

**ब) इतर महाविद्यालयांमधून आपल्या महाविद्यालयामध्ये बदली झालेल्या कर्मचा-यांच्या माहितीचे विवरणपत्र**

| S. N. | Name of the Employee | Designation | H T E Sevaarth Id | Subject (for Teachers Only) | Order No. | Order date | Date of Joining | Post id |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

Signature of the Principal/Registrar/
Finance & Accounts Officer
Name of the College/University

**तसेच ज्या महाविद्यालयांमध्ये/अकृषी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या नव्याने नियुक्त्या झालेल्या आहेत आणि त्यांची वेतननिश्चिती होऊन सदरहू वेतननिश्चिती लेखा अधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी मान्य केलेली आहे** अशा सर्व कर्मचा-यांचा समावेश एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करण्यासाठी त्यांचे Template 4 एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये भरुन या कार्यालयास फॉरवर्ड करावे व त्याची प्रत आणि इतर सर्व अनुषंगिक कागदपत्रे सोबत जोडण्यात येऊन_खाली नमूद केलेल्या दिनांकास वेळेत याच कार्यालयामध्ये उपस्थीत रहावे.

**२. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये करावयाचे बदल -**

एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये नावात बदल, बँक खात्यामध्ये बदल वा इतर कोणत्याही प्रकारचे बदल करणे आवश्यक असल्यास (प्राचार्य पदाच्या मुदतीत वाढ करणे सोडून) त्याप्रमाणे प्रणालीमध्ये योग्यते बदल करुन या कार्यालयास फॉरवर्ड करण्यात यावेत व या अनुषंगानेची सर्व कागदपत्रे सोबत जोडून खाली नमूद केलेल्या दिनांकास व वेळत याच कार्यालयामध्ये उपस्थीत रहावे.

तसेच या पत्राद्वारे सर्व महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठांना कळविण्यात येते की, एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये Employee Statistics हया टॅबमध्ये कर्मचा-यांची माहिती उपलब्ध आहे त्यामध्ये नमूद असलेली सर्व माहिती तपासून त्यामध्ये जर काही बदल करावयाचे असल्यास त्याप्रमाणेदेखील प्रस्तावीत करण्यात यावे.

**३. अर्जित रजा रोखीकरणाचे प्रस्ताव -**

या विभागाच्या अधिपत्याखालील महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठातील ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या अर्जित रजा रोखीकरणाचे आदेश निर्गमीत केलेले आहेत परंतू अजूनही त्याचे प्रदान

झालेले नाही अशा सर्व कर्मचा-यांचे प्रस्ताव खालील विवरणपत्रामध्ये खाली नमूद केलेल्या दिनांकास वेळेत याच कार्यालयात उपस्थीत राहून सादर करावेत. यासाठी खाली नमूद केलेली कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडण्यात यावीत. **अशासकीय अनुदानित महाविद्यालये आणि अकृषी व अभिमत विद्यापीठांमधील सेवानिवृत्त कर्मचा-यांना सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्याप्रमाणे अर्जित रजा रोखीकरणाची रक्कम अदा करण्याबाबत अद्यापही शासनादेश प्राप्त नसल्यामुळे सध्या ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे संबंधीतांच्या अर्जित रजा रोखीकरणाच्या रक्कमेचे परिगणन करण्यात यावे.**

ए) या कार्यालयाने संबंधीत कर्मचा-याच्या नावे काढलेल्या आदेशाची प्रत.

बी) लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी दिलेले अंतिम वेतन प्रमाणपत्र.

सी) देय असलेल्या रक्कमेचे परिगणन.

**STATEMENT**

**STATEMENT SHOWING THE AMOUNT OF EARN LEAVE ENCASHMENT**

Name of the College – College Code –

| S. N. | Name of the Employee | Designation | Date of Retirement | Order No. & Date | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Signature of the Principal/Registrar/
Finance & Accounts Officer
Name of the College/University

**वरील सर्व माहिती घेऊन याच कार्यालयामध्ये दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत उपस्थीत रहावे.**

**ज्या महाविद्यालयांची वरील सर्व बाबींची माहिती निरंक आहे त्यांनी उपस्थीत राहण्याची आवश्यकता नाही.**

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण),
पुणे विभाग, पुणे